**विकास योजना- कल्याण-डोंबिवली —सेक्टर-२**
कल्याण-डोंबिवली शहराच्या वगळलेल्या क्षेत्राच्या अधिसूचनेमधील नोट-बी नुसार अधिसुचना निर्गमित करणेबाबत-

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग,**
**मुख्य इमारत, ४ था मजला, मंत्रालय, मुंबई ३२.**
**शासन निर्णय क्र.टिपीएस-१२१३/१९९३/प्र.क्र.१३/१४/नवि-१२**
**दिनांक :- ६ ऑगस्ट, २०१५.**

**शासन निर्णय**:-सोबतची शासकीय अधिसुचना (मराठी व इंग्रजी) महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्रात प्रसिध्द करावी.

**महार।ष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

( सुनिल फाटक )
कार्यासन अधिकारी

प्रति,

१. विभागीय आयुक्त ,कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई
२. संचालक, नगर रचना ,महाराष्ट्र राज्य, पुणे.
३. सहसंचालक नगर रचना, कोकण विभाग, नवी मुंबई
४. आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण.
५. सहायक संचालक नगररचना, ठाणे शाखा, जि.ठाणे.
६. व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, चर्नीरोड, मुंबई.
(त्यांना विनंती करण्यात येते की, सोबतची शासकीय अधिसुचना महाराष्ट्र शासनाच्या साधारण राजपत्राच्या भाग-एक कोकण विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्यांच्या प्रत्येकी ५ प्रती या विभागास, संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे , आयुक्त, कल्याण-डोंबिवली महानगरपालिका, कल्याण, सहसंचालक, नगर रचना, नवी मुंबई, कोकण विभाग, कोकण भवन व सहाय्यक संचालक,नगर रचना, ठाणे शाखा, जि. ठाणे यांना पाठवाव्यात.)
७. कक्ष अधिकारी, (नवि-२९) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
(त्यांना विनंती करण्यात येते की, सदरहू अधिसूचना विभागाच्या वेबसाईटवर प्रसिध्द करावी.)
८. निवडनस्ती (कार्यासन नवि-१२)

kalam ३७ letter

**महाराष्ट्र शासन**
**नगर विकास विभाग**
**मंत्रालय,मुंबई-४०००३२.**
**दिनांक:- ६ ऑगस्ट, २०१५.**
**अधिसुचना**

क्रमांक-टिपीएस-१२१३/१९९३/प्र.क्र.१३/१४/नवि-१२

**महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६**

ज्याअर्थी, कल्याण- डोंबिवली शहराच्या सेक्टर १ व २ ची विकास योजना त्यांच्या विकास नियंत्रण नियमावलीसह महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम,१९६६ चे कलम ३१(१) अन्वये (यापुढे ज्याचा उल्लेख " उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) शासन नगर विकास अधिसुचना टिपीएस-१२९९/१९१०/प्र.क्र.३४/ २०००/नवि-१२, दिनांक ३ सप्टेंबर, २००५ अन्वये भागश: मंजूर केली असून, वगळलेल्या क्षेत्राची विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३१(१) अन्वये शासन नगर विकास विभागाची अधिसुचना क्रमांक टिपीएस-१२०७/६०४/प्र.क्र.४९४/०८/नवि-१२, दिनांक १४ सप्टेंबर, २००९ (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त अधिसुचना" असा करण्यात आला आहे.) अन्वये मंजूर करण्यात आली आहे.

आणि ज्याअर्थी, उक्त विकास योजनेच्या प्रस्तावानुसार मौजे गजबंधन पाथर्लो, येथील न.भू.क्र.१०३६६ (भाग), १०३६९ ते १०३८२ (सर्व भाग) , १०३८३ ते १०३८६, १०३९३ ते १०४११ व १०४१२ (भाग) हे भूखंड (यापुढे ज्यांचा उल्लेख "उक्त जमिनी" असा करण्यात आला आहे) यांचा समावेश अन्य लगतच्या जमिनींसह, आरक्षण क्र. ९३-बगीचा या आरक्षणाम ये समाविष्ट होत आहेत. (यापुढे ज्याचा उल्लेख "उक्त आरक्षण" असा करण्यात आ ला आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त अधिसुचनेमधील नोट-बी नुसार अधिकृत बांधकामाखालील क्षेत्र आरक्षणातून वगळणेबाबतची तरतूद आहे ;

आणि ज्याअर्थी उक्त अधिसुचनेमधील नोट-बी मधील तरतुदीनुसार उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण वगळणेची विनंती श्री. जयंत गोपाळ म्हात्रे यांनी दिनांक १/९/२०१० च्या पत्रान्वये शासनास केली आहे ;

आणि ज्याअर्थी, आवश्यकती चौकशी केल्यानंतर व संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचा सल्ला घेतल्यानंतर उक्त जमीनीवरील उक्त आरक्षण उक्त अधिसुचनेच्या नोट-बी नुसार वगळणे आवश्यक आहे, असे शासनाचे मत झाले आहे;

त्याअर्थी, आता शासन याद्वारे घोषित करते की, मौजे गजबंधन पाथर्ली, येथील न. भू. क्र. १०३६६ (भाग), १०३६९ ते १०३८२ (सर्व भाग) , १०३८३ ते १०३८६, १०३९३ ते १०४११ व १०४१२ (भाग) ही जागा "आ. क्र. ९३- बगीचा" या आरक्षणामधून वगळून ती जागा क्षेत्र रहिवास विभागास समाविष्ट करण्यात येत आहे.

०२. सदरचा मंजूर फेरबदल ही अधिसूचना शासन राजपत्रात प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

०३. उक्त मंजूर फेरबदल दर्शविणारा भाग नकाशा नागरीकांच्या अवलोकनार्थ कार्यालयीन वेळेमध्ये कामकाजाच्या दिवशी खाली नमूद कार्यालयामध्ये एक महिन्याच्या कालावधी करिता उपलब्ध राहील.

१) आयुक्त, कल्याण डोंबिवली महानगरपालिका, कल्याण
२) सहसंचालक नगर रचना, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
३) सहाय्यक संचालक, नगररचना, ठाणे शाखा, जि.ठाणे.

सदर फेरबदलाची अधिसूचना ही महाराष्ट्र शासनाच्या www. maharashtra.gov.in वेबसाईटवर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने**

**(सुनिल फाटक)**
**कार्यासन अधिकारी**

D/KALAM/ADISUHNA २०१२

**GOVERNMENT OF MAHARASHTRA**
URBAN DEVELOPMENT DEPARTMENT
Mantralaya, Mumbai 400 032.
Date :- 6th August, 2015.

**NOTIFICATION**

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966**

No. TPS-1213/1993/C.R.13/14/UD-12

Whereas, the Development Plan of Sector-1 and II of the city of Kalyan-Dombivali (hereinafter referred to as "the said Development Plan") has been partly sanctioned by the Government in Urban Development Department under section 31(1) of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Maharashtra XXXVII of 1966) (hereinafter referred to as "the said Act") vide Notification No. TPS-1299/1910/CR-34/2000/UD-12 dated the 3rd September, 2005 and the excluded portion of Development Plan has been sanctioned under section 31(1) of the said Act, vide Notification No. TPS-1207/604/CR494/08/UD-12 dated the 14th September, 2009 (hereinafter referred to as "the said Notification");

And whereas, in the said Development Plan, land bearing C.T.S. No. 10366(part), 10369 to 10382 (all parts), 10383 to 10386, 10393 to 10411 and 10412(part) of village Gajbandhan Patharli (hereinafter referred to as "the said lands") along with other adjectment lands are included in the reservation of "Site No. 93-Garden" (hereinafter referred to as "the said Reservation");

And whereas, the Note-B of the said Notification provides the provision regarding the exclusion of the area under the existing authorized structure from reservation;

And whereas, as per the Note-B of the said Notification Shri. Jayant Gopal Mhatre has requested Government vide letter dated 1/9/2010 to delete the said reservation on the said lands;

And whereas, after making necessary enquiries and after consulting the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, the Government is of the opinion that it is necessary to delete the said lands from the said reservation as per the provision of Note-B of the said Notification;

Now therefore, the State Government hereby declares that, the land bearing C.T.S. No. 10366(part), 10369 to 10382 (all parts), 10383 to 10386, 10393 to 10411 and 10412(part) of village Gajbandhan Patharli are deleted from the reservation of "Garden" site No. 93 and the said lands are included in Residential Zone.

**02.** The date of publication of this Notification in the Maharashtra Government Gazette is fixed as the date of coming into force of this sanctioned modification.

**03.** The part plan showing the said sanctioned modification shall be made available for inspection by the general public during office hours on all working days at the following offices for a period of one month:-

i) The Commissioner, Kalyan-Dombivali Municipal Corporation, Kalyan.

ii) The Joint Director of Town Planning, Konkan division, Konkan Bhavan, Navi Mumbai.

iii) The Assistant Director of Town Planning ,Thane Branch, Thane.

**04.** This notification shall also be published on the Government Website at_ www.maharashtra .gov.in.

**By order and in the name of the Governor of Maharashtra**

**(Sunil Phatak)**
**Section Officer**

D/KALAM/ADISUHNA २०१२